वीतराग-विज्ञान

वीतराग-विज्ञान हे, त्रैलोक्याचे सार।
वीतराग-विज्ञानाचा, घरोघरी होय प्रसार।।

वर्ष : ३३ (वीर नि. संवत् २५४५) ४०० अंक : ३

योगसार पद्यानुवाद

गृह-व्यापारी रमुनिहि जाणति, हेय-उपादेयाला जे।
आणि ध्याति जिनदेवा निशिदिन, मिळविति झट निर्वाणा ते।।१८।।

शुद्ध मने जिन स्मरा, जिनांचे चिंतन अन् जिनध्यान करा।
परमात्म्याच्या ध्याने ऐशा क्षणी परमपद प्राप्त करा।।१९।।

निज शुद्धात्मा आणि जिनेंद्रामधी भेद मुळि नच जाण।
तेच निश्चये मोक्षासाठी, कारण हे योगिन् ! जाण।।२०।।

जो जिन तोची निज शुद्धात्मा, सिद्धांताचा सारच हा।
ऐसे जाणुनि हे योगीशा ! मायाचारा शीघ्र त्यजा।।२१।।

जो परमात्मा तोच मी असे, जो मी तोची परमात्मा।
ऐसे जाणुनि योगिन् ! मुळि नच, करि तू अन्य विकल्पांना।।२२।।

लोकाकाशाइतुका आत्मा, शुद्ध प्रदेशे पूर्ण असे।
ध्याशिल त्या आत्म्या निशिदिन तर, मिळविशील झट मोक्षाते।।२३।।

लोकाकाशप्रमाण निश्चये, व्यवहारे देहाइतुका।
आत्मस्वभाव असा जो जाणी, तो मिळवी शीघ्रच मोक्षा।।२४।।

अनादिपासुनि फिरला जीवच, योनित चौऱ्यांशी लक्ष।
अनंत फिरुनिहि सम्यक्त्व न त्या, मिळेल हे जाणी खचित।।२५।।

शुद्धात्मा हा चेतनामयी, बुद्ध नि जिन केवलज्ञानी।
ऐसा आत्मा निशिदिन ध्यावा, जर इच्छिसि शिवलाभ क्षणी।।२६।।

जीवा ! जोवर तू नच भावशि, निर्मल आत्मस्वभावे।
तोवर मोक्षा नच जाशिल मुळि, मग जा तू तुज हवे तिथे।।२७।।

– पंडित मनोहरराव मारवडकर

आत्मार्थी बांधवांना...

आत्मसाधनेमध्ये संसाराचे विविध प्रतिकूल-अनुकूल संयोग येतच राहतात, यामध्ये कसलीही आश्चर्याची बाब नाही. परंतु अशा प्रसंगी आपल्या आत्मार्थितेच्या बळाने आपल्या संपूर्ण शक्ती उपयोगात घेऊन आत्मसाधनेमध्ये अडिग राहणे, अखंडपणे कायम ठेवून त्यामध्ये दृढतेपूर्वक पुढे जाणेच आपले कर्तव्य आहे.

आत्मार्थिता - हे असे महान बळ आहे की याच्यापुढे जगातील कोणतीही शक्ती चालत नाही. जगातील कोणतीही ताकत आत्मार्थीला त्याच्या मार्गाहून च्युत करू शकत नाही. वास्तविक पाहता आत्म्यार्थ्याला या जगात कोणतेही विघ्न नाहीच.

तथापी हे जीवा ! तुला जर अडचण असेल तर पूर्वीच्या महापुरुषांच्या जीवनाचे स्मरण कर. त्या साधक संतांनी कशा-कशा प्रसंगी आपली आराधना चालू ठेवली. त्यांचे स्मरण करून त्यांच्या उदाहरणाने आपल्या आत्म्याला देखील आराधनेमध्ये उत्साहित कर.

आत्म्यार्थ्याचे परिणाम उल्हासमय असतात, कारण आत्म-स्वभावाला साधून त्याला अल्प काळातच संसारातून मुक्त होऊन सिद्ध व्हायचे आहे. त्यामुळे त्याला निरंतर आपल्या मुक्तीचा उल्हास असतो आणि त्यामुळेच तो उल्हसित वीर्यवान असतो. पूर्वी ज्याला तो कधी ज्याची साधना करू शकला नाही, अशा आपल्या सम्यग्दर्शनादी कार्याची साधना करण्यासाठी आत्मार्थी जीवाचे हृदय निरंतर उत्साहित असते.

- आध्यात्मिकसत्पुरुष श्रीकानजीस्वामी

(वीतराग-विज्ञान (हिंदी), ऑक्टोबर १९८४, पृष्ठ ३२)

दो तरह के भगवान

– डॉ. हुकमचंद भारिल्ल

(दोहा)

निज आतम का स्मरण नमन करूँ अरहंत।
निज आतम के रमण से आवे भव का अन्त।। १।।

(वीर)

हे भव्य! सुनो भगवान दो तरह के होते जगतीतल में।
पहले रहते जिनमन्दिर में दूजे रहते तनमन्दिर में।।
पहले पर हैं, दूजे हैं निज; पहले पर्यायरूप भगवन।
दूजे द्रव्यरूप जिनको कहते हैं कारणपरमातम।। २ ।।

अरे आज तक मुक्ति गये जो वे हैं सभी सिद्ध भगवान।
उनकी ही अरहंत दशा की जिन प्रतिमाओं का निर्माण।।
और प्रतिष्ठित होकर वे सब बनती हैं जिनदेव महान।
जिनमन्दिर में राजित होकर वे ही बनती हैं भगवान।। ३ ।।

उनकी पूजन भक्ति भाव से जो करते उन भव्यों को।
अरे सातिशय पुण्यबंध होता है जिनवर भक्तों को।।
सामान्य पुण्य से सब लौकिक सुविधायें तो मिल जाती हैं।
ए.सी. बंगले ए.सी. मोटर सब सुविधायें जुट जाती हैं।। ४ ।।

ए.सी. जैसी सुविधायें तो बिल्ली–कुत्तों को मिल जातीं।
हम से भी अच्छी सुविधायें उनको भी तो हैं जुट जातीं।।
उनको तो ये सब सुविधायें बिन श्रम के ही हैं मिल जाती।
हमको श्रम करने पर ही तो ये सब सुविधायें जुट पातीं।। ५।।

हम स्वयं जुटाते हैं तब ही मिलती हैं ये सब सुविधायें।
कुत्ते-बिल्ली कुछ करें नहीं फिर भी मिलतीं ये सुविधायें।।
पर मुक्तिमार्ग में उपयोगी साधन तो प्राप्त नहीं होते।
अरे सातिशय पुण्योदय से ही वे हमें प्राप्त होते।। ६।।

देव-शास्त्र-गुरु का अर्चन अर जिनवाणी का श्रवण-मनन।
और देशना की लब्धि निज आतम का होता चिन्तन।।
निज आतम का होता चिन्तन साधर्मीजन का सहज मिलन।
सत्गुरुओं का सत्संग और होते प्रतिदिन जिनवर दर्शन।। ७।।

अरे सातिशय पुण्य बंधे जिनप्रतिमाओं के अर्चन से।
अर सब सुविधायें मिलें हमें जिनदर्शन से जिनपूजन से।।
भले सातिशय पुण्य बंधे पर उससे कर्म नहीं कटते।
स्वर्गसंपदा भले मिले पर हम भगवान नहीं बनते।। ८।।

हम भगवान नहीं बनते न हमको मुक्ति मिलती है।
भव के सब भोग मिलें लेकिन कर्मों से मुक्ति न मिलती है।।
कर्मों से मुक्ति न मिलती है पर कर्मबंध ही होता है।
कर्मों के बंधन से भाई भव-भव में रुलना होता है।। ९।।

यदि भगवान तुम्हें बनना निज को देखो निज को जानो।
निज में ही जमकर रम जावो अर नित ही निज को तुम ध्यावो।।
अपने में ही अपनेपन से अपने में जमने-रमने से।
कर्मों से मुक्ति मिलती है निज में अपनापन करने से।। १०।।

निज में अपनापन करने से निज में सर्वस्व समर्पण से।
रे ज्ञान-ध्यान-श्रद्धान - सभी अपने में अर्पण करने से।।
अपना ही आतमराम रहे जो इस शरीर के मन्दिर में।
वह ही दूजा भगवान मुक्ति का कारण जो इस भूतल में।। ११।।

(रेखता)

अरे कारण परमातम रूप कहा जो अपना आतमराम।
यही है ज्ञान ध्यान का ध्येय यही है रे दूजा भगवान।।
इसी के आराधन से प्रभो! बने हम पर्यय में भगवान।
यही है मेरा असली रूप यही मेरी असली पहिचान।। १२।।

अरे मैं ही मेरा भगवान ज्ञान-दर्शन से हूँ परिपूर्ण।
अनन्तानन्त गुणों का पिण्ड चण्ड सर्वांग और सम्पूर्ण।।
सभी परद्रव्यों से मैं पृथक् और अपने में ही परिपूर्ण।
नहीं है मुझमें कोई कमी अरे मैं स्वयं स्वयं में पूर्ण।। १३ ।।

देह में रहूँ देह से भिन्न देह जड़ मैं चेतन सर्वांग।
देह में ज्ञान नहीं है रंच ज्ञान का केतन[१] मैं सर्वांग।।
शान्ति का सागर सहजानन्द ज्ञान का पिण्ड और सुखकंद।
परम आनन्द सहज आनन्द अरे आनन्द और आनन्द।। १४ ।।

अरे सम्यक् श्रद्धा का प्रभो कहा जो एकमात्र श्रद्धेय।
अरे रे परमशुद्धनिश्चयनय का जो एकमात्र है ज्ञेय।।
अरे रे श्रद्धा का श्रद्धेय, ज्ञान का ज्ञेय ध्यान का ध्येय।
वही है मेरा आतमराम वही है एकमात्र आदेय।। १५ ।।

यही है एकमात्र आदेय यही है एकमात्र श्रद्धेय।
यही है मंगल उत्तम शरण यही है धर्मध्यान का ध्येय।।
अरे यह ही आनन्द स्वरूप यही कारणपरमातम रूप।
यही है परमभाव का रूप यही है अद्भुत और अनूप।। १६।।

हमारा मन पापों से बचे इसलिये जिनमन्दिर में जाँय।
और सामान्य पुण्य से बचें क्योंकि वह भोगों में उलझाय।।
यदी भोगों में तुम उलझे तो उससे होय पाप का बंध।
भोग से बचो, पाप मत करो और तुम हो जावो निर्बन्ध।। १७।।

अरे मिथ्यात्वभाव को तजो और तुम पुण्य-पाप से बचो ।
निरन्तर अपने में ही रमो और अपने आतम को भजो।।
एक वह ही भजने के योग्य एक वह ही रमने के योग्य।।
उसी से प्रकटे आतमधर्म उसी से कटते हैं सब कर्म।। १८।।

तुम्हारा आतम है भगवान करो उस आतम का श्रद्धान।
करो तुम उस आतम का ज्ञान करो तुम उस आतम का ध्यान।।
अरे इतना करने से आप बनेंगे पर्यय में भगवान।
यही है एकमात्र कर्त्तव्य यही है अद्भुत कार्य महान।। १९।।

(दोहा)

निज आतम भगवान की महिमा अपरंपार।
निज आतम के ध्यान से हो आनन्द अपार।। २०।।
यह ही निश्चय ध्यान है सम्यग्दर्शन ज्ञान।
निश्चय रत्नत्रय यही यह ही धर्म महान।। २१।।

-●-

संपादकीय

योगसार अनुशीलन

(मागील अंकावरून पुढे...)

योगसार दोहा १३

मागील दोह्यांमध्ये सांगितले होते की देहादी परपदार्थांमध्ये आपलेपना मानणे अज्ञान आहे, मिथ्यात्व आहे आणि आपल्या आत्म्यामध्ये आपलेपणा सम्यक्त्व आहे.

आता या १३ व्या दोह्यामध्ये सांगितले जात आहे की आत्म्याला जाणून जर इच्छारहित तप केले तर त्या तपामुळे परमगती प्राप्त होते.

मूळ दोहा पुढीलप्रमाणे आहे –

इच्छा-रहियउ तव करहि, अप्पा अप्पु मुणेहि।
तो लहु पावहि परम-गई, फुडु संसारु ण एहि।। १३।।

(हरिगीत)

आतमा को जानकर इच्छारहित यदि तप करे।
तो परमगति को प्राप्त हो संसार में घूमे नहीं।। १३।।

हे आत्मा ! जर जू आत्म्याच्या अनुभवपूर्वक इच्छांच्या अभावरूपी तप केले तर परगती प्राप्त करशील. तुझ्या भवभ्रमणाचा अंत येईल.

वरील दोह्यामध्ये अत्यंत स्पष्ट शब्दांमध्ये सांगितले आहे की सर्व प्रकारच्या इच्छांचा निरोध तप आहे आणि तपामुळे मुक्ती प्राप्त होते. लक्षात असू द्यावे की इच्छांचा निरोध आत्मज्ञानाविना होत नाही, आत्मानुभवा-विना होत नाही. त्यामुळे आत्मानुभवपूर्वक इच्छानिरोधरूप तपाची भावना करावयास हवी.

आध्यात्मिकसत्पुरुष श्रीकानजीस्वामींनी या दोह्याचा भाव पुढीप्रमाणे स्पष्ट केला आहे –

''अशुभ भाव झाले तर पाप होते, दया-दानादीचे शुभभाव झालेत तर पुण्य होते, परंतु धर्म मात्र होत नाही. चिदानंद स्वरूपी आनंदमूर्ती भगवान आत्म्याच्या भानाविना केवळ उपवास केल्यामुळे रागाची मंदता असेल तर

मिथ्यात्वसहित पुण्यबंध होते, परंतु त्याला धर्म म्हटले जात नाही. त्यामुळे जन्म-मरणाचा अंत होत नाही.

आत्मा आपले वीतरागी, निर्दोष, अकषाय स्वरूप जाणून त्यामध्ये लीन झाल्यास इच्छारहित तप होते. त्यामुळे जन्म-मरणाचा अंत होतो.[१]

तुमचे नाव जाणावयाचे आहे, तर किती उपवास केल्यावर तुमचे नाव जाणता येईल ? मला तुमचे नाव विचारायचे नाही, उपवास करून तुमचे नाव जाणायचे आहे. हे कसे शक्य आहे ? तुमचे नाव काय आणि घर कोठे आहे ? ज्ञानाद्वारेच अज्ञानाचा नाश होऊ शकतो. त्यामुळे सर्वप्रथम आत्मज्ञान करावयास हवे. ज्ञाता-दृष्टा अशा आत्म्याचा विश्वास अर्थात् श्रद्धान-ज्ञान करावे. मग राग बाजूला होऊन स्वरूपामध्ये स्थिर झाले तरच तप होते.[२]''

या जगामध्ये आम्हाला एखाद्याचा परिचय प्राप्त करायचा असेल तर आम्ही प्रथम त्याच्या बाबतीत माहिती प्राप्त करतो. त्याला जाणणाऱ्या अन्य पुरुषाकडून त्याचे नाव, गाव इत्यादी विचारतो, उपवास करायला बसत नाही आणि असेही मानत नाही की उपवासरूपी तप केल्यामुळे त्याच्या बाबतीत सर्व काही माहित होईल. परंतु धर्माच्या बाबतीत मात्र आम्ही अशाप्रकारचा विवेक ठेवत नाही.

शेवटी आपण आपल्या आत्म्याला सुखी बनविण्याकरीताच तर धर्म करतो, उपवासादी तप करतो. जर हे सत्य आहे तर काय आम्ही त्या आत्म्याच्या बाबतीत खरी माहिती प्राप्त करावयास नको ?

केलीच पाहिजे, अवश्य केली पाहिजे. ती माहिती आम्हाला आगमातून प्राप्त होईल, परमागमातून प्राप्त होईल. त्याचे जाणकार विद्वानांकडून प्राप्त होईल, संतांकडून प्राप्त होईल. त्यासाठी जिनवाणीचा स्वाध्याय करावा. विद्वान व संतांचा समागम करावा. परंतु आम्ही असे मानतो की उपवासरूपी तप केल्याने सर्व काही होईल, परंतु असे होणार नाही.

स्वामीजी देखील आम्हाला हेच समजावू इच्छितात.

या गाथेमध्ये देखील हेच सांगितले आहे की आत्मज्ञानपूर्वक, आपल्या आत्म्याच्या अनुभवपूर्वक जर आम्ही इच्छांच्या निरोधरूपी तप केले तर आम्हाला परमपदाची प्राप्ती होईल, मुक्ती प्राप्त होईल.

१) योगसार प्रवचन, पृष्ठ : २० २) योगसार प्रवचन, पृष्ठ : २०

बारा तपांपैकी सर्वाधिक महत्त्वपूर्ण तप हे ध्यान नावाचे बारावे तप आहे. जर आम्ही आत्मज्ञानपूर्वक सतत अंतर्मुहूर्तपर्यंत आत्मध्यान केले तर चार घाती कर्मांचा अभाव होऊन केवलज्ञानाची प्राप्ती होते, अनंत अतींद्रिय आनंदाची, सुखाची प्राप्ती होते.

ध्यानाव्यतिरिक्त दुसरे सर्वाधिक महत्वपूर्ण तप स्वाध्याय आहे, कारण सत्शास्त्रांच्या स्वाध्यायानेच आत्मज्ञानाची प्राप्ती होते.

त्यामुळे जिनवाणीमध्ये ज्ञान व ध्यान, आत्मध्यान व आत्मध्यानाचा सर्वाधिक महिमा गायिला आहे. आत्मार्थी बंधू-भगिनींचे हे परम कर्तव्य आहे की त्यांनी आपले जीवन ज्ञान-ध्यानामध्ये लीन करावे अर्थात् आत्म्याच्या ज्ञानामध्ये लावावे, आत्म्याच्या ध्यानामध्ये लावावे.

योगसार दोहा १४

तेराव्या दोह्यामध्ये असे म्हटले होते की जर तू आत्मज्ञानपूर्वक इच्छानिरोधरूप तप करशील तर तुला मुक्तीची प्राप्ती होईल.

आता या १४ व्या दोह्यामध्ये म्हटले जात आहे की बंध आणि मोक्ष परिणामांनीच होतो. त्यामुळे तू आपल्या परिणामांना ओळख.

मूळ दोहा पुढीलप्रमाणे आहे -

परिणामे बंधु जि कहिउ, मोक्ख वि तह जि वियाणि।
इउ जाणेविणु जीव तुहुँ, तहभाव हु परियाणि।। १४।।

(हरिगीत)

परिणाम से ही बंध है अर मोक्ष भी परिणाम से।
यह जानकर हे भव्यजन ! परिणाम को पहिचानिये।। १४ ।।

परिणामांनी कर्माचा बंध सांगितला आहे. त्याचप्रमाणे परिणामांनीच मोक्ष होतो. हे जीव ! तू असे जाणून आपल्या परिणामांना ओळख.

बंधाच्या कारणांनी मीमांसा करताना समयसार बंधाधिकारामध्ये लिहिले आहे-

(पृथ्वी)

न कर्मबहुलं जगन्न चलनात्मकं कर्म वा
न नैककरणानि वा न चिदचिद्वधो बंधकृत।

यदैक्यमुपयोगभूः समुपयाति रागादिभिः
स एव किल केवलं भवति बंधहेतुर्नृणाम् ।। १६४ ।।

(हरिगीत)

कर्म की ये वर्गणायें बंध का कारण नहीं ।
अत्यन्त चंचल योग भी हैं बंध के कारण नहीं ।।
करण कारण हैं नहीं चिद्-अचिद् हिंसा भी नहीं ।
बस बंध के कारण कहे अज्ञानमय रागादि ही ।। १६४ ।।

पुरुषांकरीता कर्मबंध करणारा न कर्मयोग्य पुद्गलांनी भरलेले लोक आहे, न चलनस्वरूपी कर्म अर्थात् मन-वचन-कायेची क्रिया आहे, न अनेक प्रकारचे करण आहे आणि न चेतन-अचेतनाचा घात आहे, परंतु आत्म्यामध्ये रागादींसह होणारी एकत्वबुद्धीच एकमेव बंधाचे वास्तविक कारण आहे.

याचा भावानुवाद पंडित बनारसीदासजींनी पुढीलप्रमाणे केला आहे-

(सवैया इकतीसा)

कर्मजाल वर्गना सौं जग मैं न बंधै जीव,
बंधै न कदापि मन-वच-काय-जोग सौं ।
चेतन अचेतन की हिंसा सौं न बंधै जीव,
बंधै न अलख पंच-विषै-विष-रोग सौं ।।
कर्म सौं अबंध सिद्ध जोग सौं अबंध जिन,
हिंसा सौं अबंध साधु ग्याता विषै-भोग सौं ।
इत्यादिक वस्तु के मिलाप सौं न बंधै जीव,
बंधै एक रागादि असुद्ध उपयोग सौं ।।

जगामध्ये हा जीव कार्माणवर्गणांनी बांधला जात नाही व मन-वचन-कायेच्या योगाने बांधला जात नाही. तसेच चेतन-अचेतनाच्या हिंसेने देखील कर्मबंध होत नाही आणि पंचेंद्रियांच्या विषयरूपी विषाच्या रोगाने देखील हा अलख आत्मा बंधनाला प्राप्त होत नाही.

कार्मणवर्गणांच्या मध्यभागी राहून देखील सिद्धांना बंध होत नाही, सयोगी झाल्यावर अरहंत भगवंतांना बंध होत नाही, ईर्या इत्यादी समितींचे अवलंबन घेणाऱ्या साधूंना भूमिकेनुसार होणाऱ्या सूक्ष्म हिंसेने बंध होत नाही आणि भूमिकेनुसार होणाऱ्या भोगांनी देखील ज्ञाता सम्यग्दृष्टी जीवांना देखील बंध होत नाही.

अशाप्रकारे आपण पाहतो की कार्मणवर्गणा, मन-वचन-कायरूप योग, चेतन-अचेतनाची हिंसा आणि पंचेन्द्रियांच्या भोगाने जीवाला बंध होत नाही, कारण **बंधाचे कारण तर एकमेव रागादिभावच आहेत, अशुद्धोपयोगच आहे, रागादींनी संयुक्त अशुद्धोपयोगच आहे.**

या दोह्याचा भाव आध्यात्मिकसत्पुरुष श्रीकानजीस्वामींनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे -

''आपले अशुद्ध परिणाम -मिथ्यात्वाचे परिणाम, शुभाशुभभाव, अव्रताचे भाव, प्रमाद-कषायाचे परिणाम - हे सर्व परिणामच बंधाचे कारण आहेत. शुद्धस्वरूपी आत्माच्या सन्मुखतेचे परिणाम मोक्षाचे कारण आहेत. आपल्या शुद्ध स्वभावाच्या सन्मुखतारूप निश्चय रत्नत्रयाचे परिणामच मोक्षाचे कारण आहेत-असे तीर्थंकरदेव शंभर इंद्र आणि गणधरांच्या उपस्थितीत म्हणतात.[१]

पर वस्तु से बंध नहीं, कोई जीव मरे या बचे, लक्ष्मी जाये या रहे, लक्ष्मी आने की क्रिया हो या जाने की क्रिया हो - ये सब तुझे बंध के कारण नहीं; परन्तु उनकी तरफ की रुचि - आसक्ति पूर्वक तेरे परिणाम ही बंध के कारण हैं।[२]

परसन्मुखतेचे परिणाम आत्म्याकरीता बंधाचे कारण आहेत आणि स्वसन्मुखतेचे परिणाम आत्म्याला मुक्तीचे कारण आहेत.[३]''

जगामध्ये कर्मबंधाचे मूळ कारण एकमेव आत्म्याचे परिणामच आहेत. परपदार्थांच्या लक्ष्याने होणारे मोह-राग-द्वेषाचे परिणाम बंधाचे कारण आहेत आणि आपल्या आत्म्याच्या लक्ष्याने होणारे वीतरागी परिणाम मुक्तीचे कारण आहेत

तात्पर्य हे आहे की जरी परपदार्थ व त्यांचे परिणमन बंधाचे कारण नाही आणि परपदार्थ व त्यांचे परिणमन मुक्तीचे देखील कारण नाही; तथापी परपदार्थांच्या लक्ष्याने होणारे आम्याचे परिणाम बंधाचे कारण आहेत आणि आपल्या आत्म्याच्या लक्ष्याने उत्पन्न होणारे आत्म्याचे वीतरागी परिणाम मुक्तीचे कारण आहेत. ●

---

१) योगसार प्रवचन, पृष्ठ : २१ २) योगसार प्रवचन, पृष्ठ : २१-२२
३) योगसार प्रवचन, पृष्ठ : २२

समयसार प्रवचन...

ज्ञानीला अगुप्ती भय नसते

परमपूज्य दिगंबराचार्य श्री कुंदकुंददेवांद्वारे रचित समयसार ग्रंथाच्या आत्मख्याती कलश टीकेतील कलश क्रमांक १५८ वर आध्यात्मिक सत्पुरुष श्री कानजीस्वामींच्या ५० वर्षापूर्वीच्या प्रवचनांचा सार क्रमश: येथे देत आहोत –

(शार्दूलविक्रीडित)

स्वं रूपं किल वस्तुनोऽस्ति परमा गुप्ति: स्वरूपे न य–
च्छक्त: कोऽपि पर: प्रवेष्टुमकृतं ज्ञानं स्वरूपं च नु:।
अस्यागुप्तिरतो न काचन भवेत्तद्भी: कुतो ज्ञानिनो
निश्शंक: सततं स्वयं स सहजं ज्ञानं सदा विंदति।।१५८।।

कोई किसी का कुछ करे यह बात संभव है नहीं।
सब हैं सुरक्षित स्वयं में अगुप्ति का भय है नहीं।।
जब जानते यह ज्ञानिजन जब होंय क्यों भयभीत वे।
वे तो सतत नि:शंक हो निजज्ञान का अनुभव करें।।१५८।।

श्लोकार्थ : वास्तविक वस्तुचे स्वरूपच वस्तुची परमगुप्ती आहे, कारण स्वरूपात पराचा प्रवेशच शक्य नाही. अरे बंधु ! स्वाभाविक ज्ञान, सहज ज्ञान तर आत्म्याचे स्वरूप आहे, यामुळेच आत्म्याची किंचितदेखील अगुप्तता नाही, तर मग आत्म्याला अगुप्तीभय कसे होऊ शकेल ? ज्ञानी तर नि:शंक राहून सहज ज्ञानाचे वेदन करतो.

(मागील अंकावरून पुढे...)

भावार्थ : 'गुप्ती' अर्थात् ज्यामध्ये कोणी चोर इत्यादी प्रवेश करू शकणार नाही, असा किल्ला, तळघर इत्यादी. त्यामध्ये प्राणी निर्भयतेपूर्वक राहू शकतो. असा गुप्त प्रदेश नसेल आणि उघडी जागा असेल, तर त्यामध्ये राहणाऱ्या प्राण्याला भय असते. ज्ञानी जाणतो की वस्तुच्या निजस्वरूपामध्ये कोणी दुसरा प्रवेश करूच शकत नाही, त्यामुळे वस्तुचे स्वरूपच वस्तुची परमगुप्ती अर्थात् अभेद्य किल्ला आहे. पुरुषाचे अर्थात् आत्म्याचे स्वरूप ज्ञान आहे, त्या ज्ञानस्वरूपामध्ये राहणारा आत्मा गुप्त आहे. कारण ज्ञानस्वरूपामध्ये दुसरा कोणी प्रवेश करू शकत नाही. असे जाणणाऱ्या ज्ञानीला अगुप्ततेचे भय कसे बरे असू शकते ? तो तर नि:शंक राहून आपल्या स्वाभाविक ज्ञानस्वरूपाचाच निरंतर अनुभव करतो.

कलश क्रमांक १५८ वर प्रवचन

''किल स्वरूपं वस्तुत: परमगुप्ति: अस्ति''वास्तविक पाहता वस्तुचे स्वरूपच वस्तुची परमगुप्ती आहे.

अहा! म्हणतात की वस्तू स्वत:च स्वत:मध्ये गुप्त आहे. त्यामध्ये अन्य कोणाचाही प्रवेश नाही. शरीर-मन-वाणी इत्यादी परद्रव्यांचा त्यामध्ये प्रवेश होत नाही. हे तर प्रगट आहे, स्वत:हून सिद्धच आहे. परंतु त्या मूळ वस्तुमध्ये तर रागादी विकल्पांचा देखील प्रवेश होत नाही. भगवान आत्मा आनंदाचा कंद प्रभू अखंड एक ज्ञायकस्वभावाची मूर्ती आहे. तो स्वरूपामध्येच परमगुप्त आहे. त्यामध्ये दया, दान इत्यादी विकल्पांचा देखील प्रवेश होत नाही.

पहा, वस्तुच्या स्वरूपालाच वस्तुची परमगुप्ती म्हटले आहे. कारण ''स्वरूपे क: अपि प्रवेष्टुम् न शक्त:'' अर्थात् स्वरूपामध्ये कोणी दुसरा प्रवेश करू शकत नाही. ज्याप्रमाणे कोणी किल्ल्यामध्ये प्रवेश करू शकत नाही, त्याचप्रमाणे स्वत: भगवान आत्मा देखील ध्रुव-अभेद्य किल्ला आहे. त्यामध्ये शरीरादी तर काय ? व्यवहार रत्नत्रयाचे विकल्प आणि एका समयाची निर्मल पर्याय देखील प्रवेश करू शकत नाही. अहा ! अंतरंगामध्ये आत्मप्रभू आहे. त्याला पर्याय पाहते, अनुभव करते, परंतु त्यामध्ये त्या पर्यायीचा देखील प्रवेश होत नाही.

अहाहा ! आपल्या शाश्वत, ध्रुव ज्ञानानंद स्वरूपामध्ये प्रवेश करू शकण्याचे सामर्थ्य इतर कोणामध्येही नाही. पर्याय तर नवीन उत्पन्न होते, परंतु ज्ञानस्वभाव मात्र अकृतच आहे. ज्ञायकस्वभाव त्रिकाळ अकृत्रिम आहे. अशाप्रकारे ज्ञानस्वभावी आत्मा परमगुप्तच आहे.

''अत: अस्य न काचन अगुप्ति भवेत्'' त्यामुळे आत्म्याला किंचित देखील अगुप्तीपणा नसल्यामुळे अगुप्तीभय नाही. जेव्हा वस्तू सदा स्वत:मध्ये गुप्तच आहे आणि धार्मिक जीवाची दृष्टी देखील सदा आपल्या शाश्वत त्रिकाळी गुप्त स्वभावावर केंद्रित आहे, तर मग अगुप्तीचे भय कोठून येणार ? कसे असू शकणार ?

''स: स्वयं सततं नि:शंक: सहजं ज्ञानं सदा विन्दति'' तो तर स्वत: निरंतर नि:शंक राहून सहजज्ञानाचा अनुभव करतो. पहा, सहा कलशांमध्ये हीच अंतिम ओळ आहे. यामध्ये म्हटले आहे की ज्ञानी स्वत: आपल्या पर्यायीमध्ये सहज ज्ञानस्वभावाला अखंडधारेने अनुभव करतो. जरी तो विकल्पांमध्ये आलेला दिसून

येतो, परंतु तो विकल्परूप होतच नाही, असे सांगितलेले आहे. त्याला तर सदैव शाश्वत एकमेव ज्ञानस्वभावाकडेच अखंडधारेने झुकाव असतो.

अहा ! या संसाराला पहा. लहान वयातच क्षणभरात मृत्यू होतो, देह साथ सोडून देतो, तर अन्य संयोगांबद्दल तर काय सांगावे ? परंतु आकस्मिक तर काहीही होत नाही. ही बाब १६० व्या कलशामध्ये विस्तारपूर्वक सांगितली जाईल की लोकामध्ये अकस्मात काहीही होत नाही. लोकाला (जगाला) माहित नसल्यामुळे त्यांना असे वाटते की हे कार्य अचानक किंवा अकस्मात झाले आहे. परंतु अकस्मात होणारी कोणतीही वस्तू या लोकामध्ये नाही. सर्व आपापल्या क्रमबद्धरूप सुनिश्चित आहेत. हा जो देह आहे, तो माती आहे, तो भगवान आत्म्याला स्पर्श देखील करीत नाही. ही बाब तिसऱ्या गाथेमध्ये आली होती की सर्व पदार्थ आपापल्या द्रव्यामध्ये अंतर्मग्न राहून आपापल्या अनंत धर्मांचे चुंबन घेतात, त्या धर्मांना स्पर्श करतात. असे असून देखील ते एकमेकांच्या गुणांना स्पर्श करीत नाहीत. अहा ! भगवान आत्मा आपल्या शक्तींना आणि पर्यायींना तर स्पर्श करतो, परंतु परमाणू इत्यादींना स्पर्श करीत नाही.

अहा ! अशा भगवानस्वरूपी आत्म्यामध्ये ज्याने दृष्टी स्थापित केली आहे, तो धर्मात्मा पुरुष निरंतर नि:शंक राहून एकमेव ज्ञानस्वरूपी आत्म्याचाच अनुभव करतो.

आनंदाचा नाथ भगवान आत्मा शाश्वत शुद्ध पदार्थ सदा गुप्तच आहे. त्यामध्ये रागाचा प्रवेश नाही. त्यामध्ये रागादी कोणाचाही प्रवेश नाही.

येथे म्हणतात की ज्ञानी नि:शंक राहून सहजज्ञानाला निरंतर अखंडधारापणे अनुभव करतो. 'सतत' व 'सदा' या शब्दांच्या माध्यमातून सांगितले आहे की ज्ञानी अखंडपणे सदैव ज्ञानाचाच अनुभव करतो. कधीही रागाचा अनुभव करीत नाही. पहा, ज्ञानीच्या निर्जरेची स्थिती. त्याची अशुद्धता नष्ट होते आणि शुद्धतेची वृद्धी होते. तसेच मोक्षामध्ये शुद्धतेची पूर्णता होते.

ज्ञानी जीवाला अगुप्तीभय नसते, कारण तो निरंतर नि:शंकभावपूर्वक राहून सहज एकमेव ज्ञानालाच अनुभवतो. अर्थात् तो शाश्वत एकमेव ध्रुवाचाच अनुभव करतो. परंतु अनुभव तर पर्यायच करते न ? ती पर्याय ध्रुवाच्या सन्मुख होऊन ध्रुवाचे अवलंबन करते, त्यामुळे असे म्हटले जाते की ज्ञानी जीव केवळ ध्रुवाचाच अनुभव करतो. **(क्रमश:)**

नियमसार प्रवचन...

भाषा समिती

परमपूज्य दिगंबराचार्य कुंदकुंदांच्या प्रसिद्ध परमागम नियमसार ग्रंथाच्या मूळ गाथा व त्यावरील श्री पद्मप्रभमलधारीदेवरचित अध्यात्मरसपरिपूर्ण तात्पर्यवृत्ती संस्कृत टीकेवर आध्यात्मिक सत्पुरुष श्री कानजी स्वामींची प्रवचने येथे क्रमश: देत आहोत –

पेसुण्णहासकक्कसपरणिंदप्पप्पसंसियं वयणं।
परिचत्ता सपरहिदं भासासमिदी वदंतस्स।।६२।।

(हरिगीत)

परिहास चुगली और निन्दा तथा कर्कश बोलना।
यह त्यागना ही समिति दूजी स्व-पर हितकर बोलना।।६२।।

गाथार्थ : पैशून्य (चुगली), हास्य, कर्कश भाषा, परनिंदा आणि आत्मप्रशंसारूप वचन परित्याग करून जो स्वपरहितरूप वचन बोलतो, त्याला भाषासमिती असते.

(मागील अंकावरून पुढे...)

टीका : येथे भाषासमितीचे स्वरूप सांगितलेले आहे.

चुगली करणाऱ्या मनुष्याच्या मुखातून निघालेले आणि राजाच्या कानांपर्यंत पोहोचलेले, कोणी एखादा पुरुष अथवा एखादे कुटुंब किंवा एखाद्या गावाला महाविपत्तीच्या कारणीभूत असे ते वचन पैशून्य आहेत. एखाद्या ठिकाणी कोण्या परजनांचे विकृत रूप पाहून अथवा ऐकून हास्य नाम नोकषायाने उत्पन्न होणारे, किंचित शुभासह मिश्रित असून देखील अशुभ कर्माचे कारण, पुरुषाच्या मुखाच्या विकाराशी संबंधित असणारे ते हास्यकर्म आहे. केवळ कर्णाच्या छिद्राच्या निकट पोहोचल्याने (ऐकल्यामुळे) जे दुसऱ्यांना अप्रीती उत्पन्न करवितात, ते कर्कश वचन आहेत. दुसऱ्यांमध्ये विद्यमान-अविद्यमान असणाऱ्या दूषणपूर्वक वचन (अर्थात् परांचे खरे आणि खोटे दोष सांगणारे वचन) ती परनिंदा आहे. आपल्या विद्यमान-अविद्यमान गुणांची स्तुती करणे म्हणजेच आत्मप्रशंसा आहे. ह्या सर्व अप्रशस्त वचनांच्या परित्यागपूर्वक स्व आणि पराच्या शुभ आणि शुद्ध परिणतीला कारणीभूत वचन भाषासमिती आहे.

श्लोक क्रमांक ८२ वर प्रवचन

वास्तविक पाहता आत्मा भाषा बोलू शकत नाही, परंतु भाषा बोलली जाते, त्यासमयी शुभराग कसा असतो ? तसेच अंतरंगामध्ये स्वरूप रमणता कशी असते ? त्याची येथे ओळख सांगितलेली आहे. मुनिराज वचन बोलतात, हे व्यवहारनयाचे कथन आहे. बोलण्याची क्रिया जडाची क्रिया आहे, वास्तविक पाहता आत्मा तर बोलतच नही.

प्रश्न : द्रव्यानुयोगाच्या अपेक्षेने तर आत्मा बोलूच शकत नाही, परंतु चरणानुयोगाच्या अपेक्षेने तर बोलू शकतो न?

उत्तर : ही बाब कोठून आणली बंधो ? येथे तर भाषा मुखातून निघते, तेव्हा राग कसा असतो, ते सांगत आहेत. व्यवहाराने आत्मा बोलू शकतो आणि निश्चयाने बोलू शकत नाही, असे स्वरूपच नाही. कारण बोलणे तर आत्म्याचा स्वभावच नाही.

पैशून्य : चुगली करणाऱ्या मनुष्याने राजाकडे कोण्या एखाद्या पुरुषाबद्दल, एखाद्या कुटुंबाद्दल किंवा एखाद्या गावाबद्दल महाविपत्तीच्या कारणीभूत वचन सांगितले, तर ती चुगली आहे. धर्मात्मा जीव अशी बाब गुप्त ठेवतात, कारण अनादी संसारामध्ये परिभ्रमण करणाऱ्या जीवांचे अनेक प्रकारचे परिणाम होतात, ते केवळ ज्ञानाचे ज्ञेय आहेत. धर्मात्मा जीव मात्र अशा जीवांच्या दोषाप्रसंगी शांती बाळगून असतात.

हास्य : होळी किंवा अनेक प्रसंगी कोण्या एखाद्याचे विकृत रूप पाहून किंवा ऐकून हास्य नामक नोकषायाने उत्पन्न होणारे, किंचित शुभासह मिश्रित असून देखील अशुभकर्माचे कारण, पुरुषाच्या मुखाच्या विकाराशी संबंध असणारे हास्यकर्म आहे. मुनिराजांना सहाव्या गुणस्थानामध्ये तीन कषाय चौकडीचा अभाव झाला आहे, वीतरागी परिणती प्रगट झाली आहे. त्यांना असे हास्यादी अशुभ भाव होत नाहीत. त्यांना असे हास्यवचन बोलण्याचे विकल्प येत नाहीत. असा शुभभाव व्यवहार आहे. तसेच अकषाय वीतरागभावरूप परिणती प्रगट झाली आहे, ती निश्चय भाषासमिती आहे. मुनिराज कोणाचीही थट्टा, मस्करी, मजाक करीत नाहीत.

कर्कश वचन : कानाने ऐकताच जे अत्यंत अप्रिय वाटतात, ते कर्कश वचन आहेत. महिला भांडण करतात, तेव्हा विंचवाच्या दंशासमान टोमणे मारण्याला सज्जनता म्हणत नाहीत. मुनिराज दुसऱ्यांना अप्रीती उत्पन्न करणारे वचन बोलत नाहीत. असा भाव ते करीत नाहीत.

परनिंदा : इतरांमध्ये असणारे दोष देखील मुनिराज प्रगट करीत नाहीत, तर मग अविद्यमान दोषांबद्दल काय सांगावे. मुनिराज भाषेद्वारा कोणाचेही दोष प्रगट करीत नाहीत, कोणाला सांगत नाहीत. अशाप्रकारचा शुभराग त्यांना असतो, परंतु त्यांना अशुभराग नसतो.

आत्मप्रशंसा : आपल्यामध्ये अविद्यमान गुणांची तर बाबच सोडा, मुनिराज तर स्वत:मध्ये विद्यमान असणाऱ्या गुणांची देखील प्रशंसा करीत नाहीत.

मुनिराज जड शब्द बोलतात, हे निमित्ताने कथन आहे. वास्तविक पाहता मुनिराज असा भावच करीत नाहीत, असे येथे सांगावयाचे आहे.

वरील सर्व प्रकारच्या अप्रशस्त वचनांचा त्याग करून स्व आणि अन्य जीवांना शुभ व शुद्ध परिणतीमध्ये निमित्तभूत वचन म्हणजेच भाषासमिती होय. त्यांच्यासमोर असणाऱ्या जीवांना ते पुण्य-पापरहित ध्रुवस्वभाव प्रगट करणारे वचन बोलतात. भाषासमितीला शुद्ध निमित्त म्हटले आहे, परंतु तेव्हाच, जेव्हा समोरचा जीव त्या निमित्ताने शुद्धभाव प्रगट करेल. जर त्या जीवाने शुभभाव केले तर त्या वचनांना शुभभावांचे निमित्त म्हटले जाईल. ही व्यवहारसमिती आहे.

याचप्रमाणे आचार्य श्री गुणभद्रस्वामींनी आत्मानुशासन मध्ये २२६ व्या श्लोकाद्वारे सांगितले आहे की -

(मालिनी)

समधिगतसमस्ता: सर्वसावद्यदूरा:
स्वहितनिहितचित्ता: शांतसर्वप्रचारा:।
स्वपरसफलजल्पा: सर्वसंकल्पमुक्ता:
कथमिह न विमुक्तिर्भाजनं ते विमुक्ता:।।

(हरिगीत)

जान लिये हैं सभी तत्त्व अर दूर सर्व सावद्यों से।
अपने हित में चित्त लगाकर सर्व प्रकार से शांत हुए।।
जिनकी वाणी स्वपर हितकारी संकल्पों से मुक्त हुए।
मुक्ति भाजन क्यों न हो जब सब प्रकार से मुक्त हुए।।

श्लोकार्थ : ज्यांनी सर्व (वस्तुस्वरूप) जाणले आहे, जे सर्व सावद्यापासून दूर आहेत, ज्यांनी स्वहितामध्ये चित्त स्थापित केले आहे, ज्यांचे सर्व प्रचार (व्यवस्था, आरंभ, बाह्य प्रवृत्ती, आपल्यामागे काम लावून घेणे) शांत झाले आहेत, ज्यांची भाषा स्व-पराला सफल (हितरूप) आहे. जे सर्व संकल्प रहित आहेत, ते विमुक्त पुरुष या लोकामध्ये विमुक्तीचे भाजन का बनणार नाहीत ? (अर्थात् असे मुनिराज अवश्य मोक्षाचे पात्र आहेत.) **(क्रमश:)**

द्रव्यसंग्रह प्रवचन...

एकदेशशुद्ध भावसंवर

परमपूज्य दिगंबराचार्य नेमिचंद्र सिद्धांतीदेवांद्वारे विरचित प्रसिद्ध द्रव्यसंग्रह ग्रंथावरील आध्यात्मिक सत्पुरुष श्री कानजी स्वामींनी दिलेली प्रवचने येथे पाठकांसाठी क्रमश: देत आहोत –

चेदणपरिणामो जो कम्मस्सासवणिरोहणे हेदू।
सो भावसंवरो खलु दव्वासवरोहणे अण्णो।।३४।।

कर्म रुकना द्रव्यसंवर और उसके हेतु जो।
शुद्धातमा के भाव वे ही भावसंवर जानिये।।३४।।

गाथार्थ : आत्म्याचा जो परिणाम कर्माच्या आस्रवाला थांबविण्यामध्ये कारण आहे, त्याला भावसंवर म्हणतात आणि जे द्रव्यास्रवाचे थांबणे आहे, तो द्रव्यसंवर आहे.

(मागील अंकावरून पुढे...)

निगोदामध्ये देखील द्रव्य व गुण त्रिकाळ आहेत आणि त्यांच्या पर्यायीमध्ये जर व्यक्तता अंशरूपामध्ये देखील नसेल तर द्रव्य व गुणांच्या अभावाचा प्रसंग उत्पन्न होतो. तेथे देखील द्रव्य-गुण पारिणामिक भावरूप आहे आणि ज्ञानाची जेवढी व्यक्तता आहे, ती क्षायोपशमिकभावरूप आहे आणि जेवढी प्रगटता नाही, ती औदयिक भावरूप आहे.

भगवान आत्मा ज्ञानस्वरूपी ध्रुव आहे आणि त्याच्या पर्यायीमध्ये अंशरूप प्रगटता आहे, त्याला ध्रुवमय कारणपर्याय म्हणणे योग्य नाही. बंधो ! कारणपर्यायीचे स्वरूप त्याहून भिन्न आहे. ते अत्यंत गूढ आणि गंभीर आहे. नियमसार शास्त्रामध्ये कारणपर्यायीचे वर्णन स्पष्टपणे आलेले आहे.

सूक्ष्म निगोदी जीवांच्या ज्ञानाचा सर्वात जघन्य अंश देखील एकदेश आवरणसहित आहे, सर्वथा आवरणसहित नाही, कारण जर जीवावर सर्वथा आवरण झाले तर जड (अजीव) होण्याचा प्रसंग उत्पन्न होईल आणि त्यामुळे वस्तूच्या सत्तेचाच नाश होईल.

वास्तविक पाहता तर विशेष क्षायोपशमिकज्ञानाच्या अपेक्षेने किंवा

केवलज्ञानाच्या अपेक्षेने ते ज्ञान आवरणसहित आहे आणि संसारी जीवांना पूर्ण क्षायिक ज्ञानाचा अभाव आहे, त्यामुळे त्यांना क्षायोपशमिक ज्ञानच आहे. ज्ञान आवरणसहित आहे अर्थात् मनुष्य आणि देवाचे क्षयोपशमज्ञानाच्या अपेक्षेने अथवा केवलज्ञानाच्या अपेक्षेने सर्वजघन्यज्ञानाला आवरणसहित म्हणतात.

येथे न्यायाने सांगितले आहे की संवराचा परिणाम एकदेश व्यक्त आणि एकदेव निरावरण तर आहेच आणि सूक्ष्मनिगोदी जीवांचे क्षयोपशमज्ञान देखील एकदेश निरावरण आहे.

या लोकामध्ये अनंत आत्मा आहेत. त्यांच्या ज्ञानाचा जेवढा विकास आहे, त्या अपेक्षेने तेवढा ज्ञानाचा प्रगटपणा आहे आणि विशेष ज्ञानवाल्यांच्या अपेक्षेने आवरण आहे. लब्धी अपर्याप्तक जीवांना थोडा प्रगटपणा आहे आणि संवरदशा-वाल्या जीवांना देखील एकदेशशुद्धता व प्रगटपणा असल्यामुळे सर्वथा आवरण कोणत्याही जीवाला नाही, हे सांगितले आहे.

''जर नेत्रपटलाच्या एकदेश निरावरणासमान (अर्थात् नेटपटल काही उघडे असेल, त्याप्रमाणे) केवलज्ञानाच्या अंशरूप ते ज्ञान असेल तर त्या एकदेशाहून देखील लोकालोकाची प्रत्यक्षता असती, परंतु असे दिसून येत नाही, परंतु अनेक ढगांनी आच्छादित सूर्यबिंबासमान किंवा निबिड नेत्रपटलासमान त्या निगोदी जीवाचे ज्ञान देखील थोडे जाणते - असे येथे तात्पर्य आहे.''

जी संवरपर्याय प्रगट झाली आहे, ती पूर्ण नाही, त्यामुळे त्याला शुद्धताच नाही, असे नाही. एकदेश निरावरण अर्थात् एकदेश प्रगट ज्ञान केवलज्ञानाचा अंश नाही, याचा अर्थ हा नाही की ते क्षायिकज्ञानाचा अंश नाही.

येथे कोणी म्हणतो की निगोदामध्ये शुभभाव होत नाही आणि त्यामध्ये शुद्धतेचा अंश देखील आहे. जर तो वाढला नाही तर वृद्धिंगत होऊन यथाख्यात चारित्ररूप कधीही होऊ शकत नाही. तसेच भव्य आणि अभव्य सर्वांमध्ये ज्ञानाचा जो प्रगटपणा आहे, तो केवलज्ञानाचा अंश आहे. तो केवलज्ञानाचा अंश नसेल तर कोणालाही केवलज्ञान होऊ शकत नाही, परंतु ही बाब येथे नाही.

पंडित टोडरमलजींनी रहस्यपूर्ण चिट्ठीमध्ये सम्यग्ज्ञानाला केवलज्ञानाचा अंश म्हटले आहे. तेथे क्षायोपशमिकज्ञान आणि निरावरण ज्ञानामध्ये - दोहोंमध्ये ज्ञानपणा आहे, त्यामुळे ते क्षयोपशमज्ञान वृद्धिंगत होऊन केवलज्ञान होते, त्यामुळे तेथे

केवलज्ञानाचा अंश म्हटले आहे, परंतु तो प्रगटपणा क्षायिकज्ञानाचा अंश नाही, सर्वथा निरावरण ज्ञानाचा अंश नाही.

निगोदामध्ये विकास झाल्यावर देखील आवरणाचे आधिक्य आहे आणि विकास कमी आहे, परंतु आवरण अधिक असल्यामुळे विकासच नाही, असे देखील नाही. विकास अवश्य आहे, परंतु तो क्षायिकच्या जातीचा नाही.

सारांश असा आहे की चेतनाच्या परिणामरूप जो ज्ञानाचा प्रगटपणा आहे, तो चेतनच्या जातीचा असून देखील क्षायिकचा अंश नाही. प्रगटपणा आणि क्षायिकज्ञानाची ज्ञानजाती तर एक आहे, परंतु जो प्रगटपणा आहे, तो क्षायिकचा अंश नाही. अशाप्रकारे जीवावर पडलेल्या आवरणाचे वर्णन केले.

आता क्षयोपशमाचे लक्षण सांगतात. सर्व प्रकारे आत्म्याच्या गुणांचे आच्छादन करणाऱ्या कर्माच्या शक्तींना 'सर्वघाती स्पर्धक' व विवक्षित एकदेशाने आत्म्याच्या गुणांचे आच्छादन करणाऱ्या कर्माच्या शक्तींना 'देशघाती स्पर्धक' म्हणतात. सर्वघाती स्पर्धकांच्या उदयाच्या अभावीच क्षय व त्यांच्या सत्‌रूप अवस्थेला उपशम म्हणतात. सर्वघाती स्पर्धकांचा उदयाभावी क्षय, त्यांचाच सत्तारूप अवस्थासहित उपशम आणि त्यांच्या एकदेशघाती स्पर्धकांचा उदय – अशाप्रकारचा क्षयोपशम सांगितला जातो. क्षयोपशमामध्ये जो आहे, त्याला क्षायोपशमिक भाव म्हणतात अथवा देशघाती स्पर्धकांचा उदय असल्यावर जीव एकदेश ज्ञानादी गुण प्राप्त करतो, तो क्षायोपशमिकभाव आहे. यावरून काय सिद्ध होते? पूर्वोक्त सूक्ष्मनिगोदाच्या जीवामध्ये ज्ञानावरण कर्माच्या देशघाती स्पर्धकांचा उदय झाल्यावर एकदेश ज्ञानगुण प्राप्त होतो. त्यामुळे ते क्षायोपशमिक ज्ञान आहे, क्षायिक ज्ञान नाही. कशामुळे? कारण तेथे कर्माच्या एकदेश उदयाचा सद्‌भाव आहे.

येथे समजाविले आहे की सर्वप्रकारे आत्म्याच्या गुणांचे आच्छादन करण्यामध्ये कर्माची शक्ती अर्थात् कर्म निमित्त आहे.

येथे शिष्य **शंका** करतो की आत्मा खूप साऱ्या कर्मांनी बांधलेला आहे, तर काय जडकर्म आत्म्यावर आवरण टाकू शकतात, परंतु आत्मा तर अनंत शक्तींनी युक्त आहे ?

समाधान : बंधो! जडकर्म तर केवळ निमित्त आहेत. त्यांच्यात तर विचार करण्याची शक्तीच नाही की मी कोण आहे ? मग ते चेतनहीन कर्म अनंत शक्तींचा धारक आत्म्याला कसा अडवू शकते, अर्थात् अडवू शकत नाही.

स्पर्धक अर्थात् कर्मस्कंधांमध्ये फळ देण्याची योग्यता. कर्माची ती योग्यता दोन प्रकारची असते - १) सर्वघाती स्पर्धक आणि २) देशघाती स्पर्धक. येथे सर्व प्रकारे आत्म्याच्या गुणांचे आच्छादन करणाऱ्या कर्माच्या शक्तीला 'सर्वघाती स्पर्धक' म्हणतात आणि विवक्षित एकदेशाने आम्त्याच्या गुणांचे आच्छादन करणाऱ्या कर्माच्या शक्तींना 'देशघाती स्पर्धक' म्हणतात.

सर्वघाती स्पर्धकांच्या उदयाचा अभाव व आत्म्याची त्यामध्ये संलग्न होण्याच्या शक्तीचा अभाव, त्याला उदयाभावी क्षय म्हणतात व त्या सर्वघाती स्पर्धकांमध्ये वर्तमानात फळ देण्याची शक्ती नाही, परंतु सत्तेत पडून राहतात, म्हणून त्याला उपशम म्हणतात अर्थात् सर्वघाती स्पर्धकांच्या उदयाच्या अभावालाच क्षय व त्यांच्याच सत्तारूप अवस्थेला उपशम म्हणतात. हा उपशम पुरुषार्थपूर्वक नसतो.

जेव्हा आत्म्यामध्ये ज्ञानगुणाची पर्याय प्रगट होण्यायोग्य असते, तेव्हा सर्वघाती स्पर्धकांच्या उदयाचा अभाव असतो आणि सर्वघाती स्पर्धकांच्या अनुदयरूप क्षय, सत्तारूप उपशम आणि देशघाती स्पर्धकांचा उदय - अशाप्रकारे निमित्ताच्या तीन प्रकारच्या योग्यतेच्या निमित्ताने होणाऱ्या जीवाच्या भावाला (परिणामाला) क्षयोपशम भाव म्हणतात. जर सर्वघाती स्पर्धकांचा सर्वथा उदय असेल तर जीव जड (अजीव) बनण्याचा प्रसंग येईल आणि सर्वथा उदय नसण्याचा प्रसंग असेल तर केवलज्ञानाची सिद्धी संसारावस्थेतच होण्याचा प्रसंग येईल आणि हे प्रत्यक्ष, आगम आणि युक्तीने बाधित आहे.

सारांश हा आहे की सर्वघाती स्पर्धकांचा उदयाभावी क्षय, सत्तारूप उपशम आणि देशघाती स्पर्धकांचा उदय - अशा या तिन्हींच्या समुदायाला क्षयोपशम म्हणतात आणि जो भाव क्षयोपशमामध्ये होतो, त्याला क्षायोपशमिकभाव म्हणतात अर्थात् देशघाती स्पर्धकांचा उदय झाल्यावर जीव एकदेश ज्ञानादी गुणांना प्राप्त करतो, त्यामुळे तो क्षायोपशमिक भाव आहे.

अशाप्रकारे येथे हे सिद्ध झाले की सूक्ष्मनिगोदातील जीवांमध्ये ज्ञानावरण कर्माच्या देशघाती स्पर्धकांचा उदय असल्यावर एकदेश ज्ञानगुण प्राप्त होतो, त्यामुळे ते क्षायोपशमिकज्ञान आहे, क्षायिकज्ञान नाही,कारण तेथे कर्माच्या एकदेश उदयाचा सद्भाव आहे. **(क्रमशः)**

कथा...

सत्याचा शोध

डॉ. हुकमचंदजी भारिल्ल यांनी लिहिलेल्या **'सत्य की खोज'** या मूळ हिंदी कादंबरीचा मराठी अनुवाद 'सत्याचा शोध' पाठकांसाठी क्रमश: येथे देत आहोत-

(मागील अंकावरून पुढे...)

''जो आहोत-केवळ त्यास बघावे, त्यालाच जाणावे, रमावे, जमावे -असेच म्हणायचे आहेना आपणास ?''

''नाही - **बघू नका, बघणे सहज होऊ द्या. जाणू नका, जाणणे सहज होऊ द्या. रमू नका-जमू नका; रमणे-जमणे देखील सहज होऊ द्या. सर्व काही सहज, जाणणे सहज, बघणे सहज. जमणे सहज, रमणे सहज, कर्तत्वाच्या अहंकाराने नव्हे, विकल्पाने देखील रहित सहज ज्ञाता-दृष्टा बना.''**

''मग...''

''मग काय ? काही विकल्प नाही. काही विकास नाही, हा देखील विकल्प नाही. विकल्पातीत, वचनातीत, निर्विकल्प, ज्ञान सहज, श्रद्धा सहज, रमणता सहज.''

याप्रमाणे न जाणे कुठपर्यंत ही चर्चा चालू होती आणि कधी ही चर्चा अचर्चेमध्ये बदलली.

न जाणो किती अनुभूती प्राप्त करू शकले, किती चर्चित विषयाला ग्रहण करू शकले, किती समजू शकले, हे देखील समजू शकले नाही की कति ती चर्चा पूर्ण ऐकू शकले. किती जणांना हे परमतत्त्व पचले, कितींना रुचले; परंतु जेव्हा चर्चा संपली तेव्हा सर्वांचे चेहरे प्रफुल्लित होते. वातावरणामध्ये एक अद्‌भुत शांती होती. सर्वच मौन होते आणि गुपचूप आपापल्या घरी निघून गेले.

चौतीस

आत्मानुभवी सत्पुरुषांच्या संपर्कामध्ये येऊन, शुद्धात्मतत्त्वाची प्रतिपादक शास्त्रे वाचून आत्म्याची चर्चा करणे वेगळे आणि शुद्धात्म्याचा अनुभव करणे वेगळे.

अधिकांश जग तर परंपरावादी असते. जो ज्या प्रकारच्या वातावरणामध्ये राहतो, त्या प्रकारच्या गप्पा तो करतो, वागतो, परंतु वस्तूच्या गंभीरतेपर्यंत फार थोडे लोक पोहोचतात. अधिकांश तर हो ला हो म्हणणारेच आणि वरून वा-वा करणारेच असतात.

जे लोक तत्त्वाच्या गंभीरतेपर्यंत पोहोचतात, त्यांना तर परमतत्त्वाची प्राप्ती होतेच, पंरतु जे आपल्या स्थूलबुद्धीमुळे परमतत्त्व प्राप्त करू शकत नाहीत. त्यांना देखील एवढा तर लाभ होतोच की जे जगाच्या वासनामय, कषायमय विषाक्त वातावरणापासून पुष्कळसे दूर राहतात. त्यांचे जीवन सहज सात्विक बनते. परिणामामध्ये देखील निर्मलता येते.

तसेच जर चांगला भविष्यकाळ असेल तर काळ प्राप्त होऊन त्यांचा देखील पुरुषार्थ जागृत होतो आणि आज नाही तर उद्या ते देखील निज तत्त्वापर्यंत पोहोचतात.

आजच्या तत्त्वचर्चेमध्ये झालेल्या आत्मानुभूतीची प्रक्रिया आणि क्रम यावर विचार करीत रूपमती आपल्या झोपण्याच्या खोलीत शिरली आणि तेवढ्यात विवेक आला.

तो कुठल्यातरी तंद्रीत होता. येताच त्याने कपाटातून अनेक शास्त्रे काढली आणि पाने उलटवीत बसला.

त्याच्या तंद्रीचा भंग करीत रूपमती म्हणाली –

''आता वाचणार का ? दहा वाजून गेले म्हटलं.''

परंतु जणू त्याने काही ऐकलेच नाही. तो अनेक ग्रंथ घेऊन त्यांची पाने उलटवीत होता. त्याचे लक्ष आपल्याकडे वेधण्यासाठी रूपमती मोठ्याने म्हणाली,

''अहो, म्हटलं ऐकलं काय ? आता झोपा. पहाटे पाच वाजता परत जागे होणार, थोडी तरी विश्रांती घ्यावी म्हणते...''

''विश्रांती, विश्रांती नाही तर काय आहे, असं कुठले काम करतो आहे. थोडा पहात होतो की ...''

''नंतर पहावे, आजची चर्चा फार छान झाली. एक गोष्ट मलाही विचारयची आहे.''

''चर्चेत का नाही विचारलंस !''

''गोष्टच तशी आहे.''

''विचार, काय विचारू इच्छितेस.''

''हेच की ज्या अनुभूतीची आपण रोज चर्चा करता, ती आत्मानुभूती आपणास तर प्राप्त झाली असेलच ना ?''

रूपमतीचा प्रश्न ऐकून विवेक गडगडून हसला. हसतच राहिला. काही बोललाच नाही आणि आपल्या कामात गढून गेला.

परंतु जेव्हा त्याने काही उत्तर दिले नाही, तेव्हा रूपमतीने आग्रह केला.

''सांगा ना, गप्प का राहिलात ? आपले हे वाचणे तर नेहमीचेच आहे, ते काय कधी संपणार आहे ?''

पाने उलटवती विवेक म्हणाला –

''वाचण्याचा प्रश्न नाही.''

''मग, माझ्या प्रश्नाचे उत्तर का नाही देत ? सर्वांच्या प्रश्नांची उत्तरे आपण देता, माझ्या प्रश्नांना का टाळता ?''

''टाळण्याचा प्रश्न नाही.''

''मग ?''

''तुझे प्रश्नच असे असतात.''

''असे म्हणजे कसे ?''

''त्यांची उत्तरं देणं मला शक्य नसतं. असे समज की मी निरुत्तर होतो.''

''असे का ?''

''माहित नाही ? सेनापती सर्व सेनेवर शासन करतो. आज्ञा देतो, परंतु त्याची पत्नी त्याच्यावर...''

''तुम्ही प्रश्न थट्टेत टाळताहात. उत्तर का नाही देत ?''

''तुझा प्रश्नच असा आहे की काय उत्तर द्यावे ?''

''का ? त्यात काय चूक आहे ?''

''ऐकूच इच्छितेस ?''

''होय.''

''ऐक. काल चर्चेमध्ये जी प्रश्नोत्तरे झाली, ती लक्ष देऊन ऐकलीस ?''

''होय.''

''काय प्रश्न होता ?''

''मला आता लक्षात नाही.''

''एवढेही लक्षात नाही.''

''नाही ना. आपणासारखी बुद्धी कुठून आणायची ?''

''एवढे तर लक्षात असेल ना की प्रश्न विचारणाऱ्याने समाधान करण्याविषयी शंका केली नाही. शिवाय म्हटले होते की ज्या शुद्धात्म्याची आपण चर्चा करता, त्याचा अनुभवदेखील आपण करता आणि ज्याचा अनुभव करण्याची प्रेरणा आपण निरंतर देता...''

''हो, असेच काहीतरी म्हटले होते.''

''कुठे तो प्रश्न करणारा की जो माझ्या आत्मानुभवामध्ये विश्वास व्यक्त करीत होता आणि कुठे तू. शंकेनेच प्रश्नाला प्रारंभ करीत आहेस. म्हणूनच तर म्हटले आहे की देशनालब्धीमध्ये आत्मानुभवी ज्ञानीच निमित्त होतात. ज्यांच्याकडून अनुभवाची रीत जाणायची, त्यांच्याविषयीच शंका असेल तर त्याने प्रश्नच विचारू नये ना. शंका असूनही जर आत्मानुभवाविषयी प्रश्न करतो आहे, म्हणजे तो देशनालब्धीचे स्वरूपही जाणत नसला पाहिजे. ज्याला आत्मानुभवी असण्यामध्ये शंका आहे, त्याच्या त्यासंबंधीच्या प्रश्नोत्तरामध्ये वेळ दवडण्यास आत्मार्थीला देखील कुठे सवड आहे? ज्याची शंका, समाधानकर्त्याविषयीच्या शंकेने सुरू होते, त्याचे समाधानही कसे व्हावे ?''

''शंका असेल तर काय करावे ?''

''कमीत कमी या शंकेचे निरसन कसेही का होईना, पण स्वत:च करून घ्यावे.''

''जर स्वत:ला जमले नाही, म्हणून प्रत्यक्ष त्यांनाच विचारले तर काय बिघडले?''

''मला आत्मानुभव आहे, असे त्याने खोटे सांगितले तर मग तो खोटे बोलतो आहे, ह्याचा निर्णय आपण कसा करणार ? त्याचप्रमाणे असे तर कोणीही म्हणेल. म्हणून त्याच्या म्हणण्याने तो आत्मानुभवी होईल ? जो स्वत:च्या गुरूचा निर्णयदेखील स्वत: करू इच्छित नाही, तो निश्चित फसेल. जो माझ्या जीवनावरून, वाणीवरून, व्यवहारावरून निर्णय करू शकला नाही, त्याला सांगून काय उपयोग ?''

''सांगितल्याशिवाय समजणार कसे ?''

''मी ज्ञानी आहे, हे जगाला समजावे, याची ज्ञानीला काय गरज आहे?''

''सांगितल्यामुळे काय तोटा होणार आहे ?''

''असे आहे, ज्ञानी स्वत:ला अज्ञानी म्हणू शकत नाही आणि ज्ञानी म्हटले तर तो जगाला अभिमानी वाटेल.''

''त्यामुळे काय होईल ?''

''काय होणार ! म्हटलेच आहे तर सिद्ध करावे लागेल, नाही तर जग शंका व्यक्त करणार.''

''आहे तर मग सिद्ध करण्यात काय अडचण आहे ?''

''त्यामुळे जग परीक्षक बनेल आणि तो परीक्षार्थी - अशा विषमतेमध्ये तो स्वत:ला कशाला गुंतवून घेईल ?''

''नाही तर मग तत्त्वाचा प्रचार कसा होणार ?''

''विकल्प आला तर तत्त्वाचे प्रतिपादन करीत. ज्याला रुचेल, जमेल, तो ऐकेल, समजून घेईल आणि आपले हित करील. ज्याला रुचणार नाही, तो ऐकणार नाही. हीऱ्याची पारख तर जव्हेरीलाच करावी लागणार.

''म्हटलेच आहे - हीरा मुख से न कहे, लाख हमारे मोल.''

''मी एक गोष्ट तुला विचारू का ?''

''विचारा ना.''

''गणिताच्या शिक्षकाकडे कोणी गणित शिकण्यास गेला म्हणजे तो विचारतो काय की तुम्हाला गणित येतं का ?''

''नाही.''

''का ?''

''कारण तो जाणून, मानूनच जातो की त्यांना गणित येतं.''

''आणि तरीही विचारले तर ?''

''सर्व त्याला हसतील, त्याला मूर्ख म्हणतील.''

''येथेही असेच समजावे.''

''तरी देखील एखाद्या अज्ञानीने विचारले तर ?''

''हसण्याशिवाय तो काय उत्तर देणार ? जास्तीत जास्त असे म्हणेल की एखादा प्रश्न विचारून बघ. जमले तर उत्तर देईन. त्यावरून तुम्हाला जे जाणता येईल, ते जाणा.''

''होय असेच म्हणेल.'' **(क्रमश:)**

वृत्तदर्शन...

२२ वे आध्यात्मिक शिक्षण-शिबिर संपन्न

जयपूर (राजस्थान) : पण्डित टोडरमल सर्वोदय ट्रस्ट तर्फे ज्ञानतीर्थ श्री टोडरमल स्मारक भवनमध्ये दिनांक १३ ते २० ऑक्टोबर २०१९ पर्यंत जिनागमातील महत्त्वपूर्ण २२ विषयांचे व्यवस्थित अध्ययन करविणारे २२ वे आध्यात्मिक शिक्षण शिबिर अनेक मांगलिक आयोजनांसह सानंद संपन्न झाले.

उद्घाटन समारंभ : दिनांक ५ ऑक्टोबर रोजी उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी आयोजित सभेमध्ये प्रमुख पाहुणे म्हूणन श्री दिनेशजी तातेड जयपूर उपस्थित होते. विद्वानांपैकी तत्त्ववेत्ता डॉ. हुकमचंदजी भारिल्ल इत्यादी अनेक विद्वान उपस्थित होते.

उद्घाटन सभेचे अध्यक्ष श्री रमेशभाई शहा अहमदाबाद (अध्यक्ष-वस्त्रापूर मंदिर), ध्वजारोहण श्री निहालचंदजी घेवरचंदजी जैन जयपूर, प्रवचन मंडपाचे उद्घाटन श्री सेवन्तीभाई गांधी अहमदाबाद, मंचाचे उद्घाटन श्री शान्तिलालजी चौधरी भीलवाडा यांचे हस्ते संपन्न झाले. या व्यतिरिक्त पण्डित टोडरमलजींच्या चित्राचे अनावरणकर्ता श्री ऋषभभाई शास्त्री अहमदाबाद व गुरुदेवश्रींच्या चित्राचे अनावरणकर्त्ता श्री सुरेशभाई ए. शहा अहमदाबाद होते. सर्व विद्वान आणि मान्यवर पाहुण्यांचे श्री शुद्धात्मप्रकाशजी भारिल्ल, जयपूर यांनी माल्यार्पण इत्यादींच्या माध्यमातून भावपूर्ण स्वागत केले.

या प्रसंगी श्री प्रेमचंदजी बजाज कोटा, श्री दिनेशजी तातेड़, श्री सुरेशभाई ए. शहा अहमदाबाद इत्यादी मान्यवरांनी आपले मनोभाव व्यक्त केले. शेवटी डॉ. हुकमचंदजी भारिल्ल यांचे मार्मिक प्रवचन झाले.

प्रवचन : शिबिरामध्ये दररोज सकाळी पूज्य गुरुदेवश्रींच्या सी.डी. प्रवचनांनंतर प्रसिद्ध तार्किक विद्वान डॉ. हुकमचंदजी भारिल्ल यांची 'तत्त्वचिंतन' विषयावर मार्मिक प्रवचने झाली. रात्रीच्या प्रवचनांमध्ये दररोज ब्र. सुमतप्रकाशजी खनियांधाना यांची 'पंचाध्यायीचे नय' विषयावर प्रवचने झाली. तत्पूर्वी पण्डित अभयकुमारजी शास्त्री देवळाली, डॉ. वीरसागरजी शास्त्री दिल्ली, डॉ. दीपकजी जैन 'वैद्य' जयपूर, पण्डित शुद्धात्मप्रकाशजी भारिल्ल जयपूर, पण्डित धर्मेन्द्रजी शास्त्री कोटा, डॉ. प्रवीणजी शास्त्री बांसवाडा इत्यादी विद्वानांच्या व्याख्यानांचा धर्मलाभ मिळाला.

पूजा विधान : प्रात:काळी नित्य-नियम पूजेसह श्री नियमसार विधान व सायंकाळी सामूहिक जिनेन्द्र-भक्तीचे आयोजन करण्यात आले. विधी-विधानाचे समस्त कार्य डॉ. शांतिकुमारजी पाटील यांचे निर्देशनात पण्डित जिनेन्द्रजी शास्त्रींद्वारे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने संपन्न करविण्यात आले. विधानाचे आमंत्रणकर्ता श्रीमती शकुन्तला धर्मपत्नी डॉ. के.एल. जैन व पुत्र-पुत्रवधू विक्रान्त-रेशू जैन जयपूर होते.

शिक्षण वर्ग : ब्र. सुमतप्रकाशजी खनियांधाना द्वारा सामान्य श्रावकाचार, पण्डित अभयकुमारजी शास्त्री देवळाली द्वारा प्रवचनसार (ज्ञानाधिकार) व मोक्षमार्गप्रकाशक (सात तत्त्व संबंधी भूल), पण्डित शांतिकुमारजी पाटील जयपूर द्वारा प्रमाणाचे प्रामाण्य व समयसारामध्ये उपयोगाचे वर्णन, डॉ. नरेन्द्रकुमारजी शास्त्री जयपूर द्वारा प्रमाणाचा विषय व फळ आणि क्रमबद्धपर्याय, डॉ. योगेशजी शास्त्री अलीगंज द्वारा परीक्षामुख व सप्तभंगी, डॉ. वीरसागरजी शास्त्री दिल्ली द्वारा सर्वज्ञसिद्धी, डॉ. संजीवकुमारजी गोधा जयपूर द्वारा नैगमादी सप्त नय व तीन लोक, पण्डित धर्मेन्द्रजी शास्त्री कोटा द्वारा बृहद्द्रव्यसंग्रह/महावीराष्टक व मिथ्याचारित्राचे स्वरूप, पण्डित प्रवीणजी शास्त्री बांसवाडा द्वारा १४ गुणस्थान व कर्मसिद्धांत, पण्डित जिनकुमारजी शास्त्री द्वारा समाधी आणि सल्लेखना, पण्डित अच्युतकांतजी शास्त्री जयपूर द्वारा निमित्त-उपादान, पण्डित चर्चितजी शास्त्री द्वारा देव-शास्त्र-गुरूंचे स्वरूप विषयाचे वर्ग घेण्यात आले.

सकाळी ५.३० वाजता पण्डित कमलचंदजी पिडावा, पण्डित सिद्धार्थजी दोशी रतलाम, व ब्र. निखिलजी भायन्दर यांच्या प्रौढ वर्गांनंतर जिनवाणी चॅनेलवर डॉ.भारिल्ल यांच्या प्रवचनांचे प्रसारण प्रवचन हॉलमध्ये मोठ्या पडद्यावर केले जात असे.

शिबिराचे आमंत्रणकर्ता श्रीमती सुनीता-प्रेमचंद बजाज व सुपुत्र तन्मय-ध्याता बजाज, कोटा व श्राविकारत्न स्व. श्रीमती कंचनदेवी धर्मपत्नी स्व.श्री धर्मचंदजी दीवान सुपुत्र श्री विद्याप्रकाश-संजयकुमार-अजय छाबडा व समस्त दीवान परिवार सूरत (सीकरवाले) होते.

शिबिरामध्ये जवळपास ५०० साधर्मी बांधवांनी दररोज १६ तास चालणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या कार्यक्रमांचा लाभ घेतला. या प्रसंगी हजारो तासांचे सीडी आणि डीव्हीडी प्रवचने आणि हजारो रुपयांचे सत्साहित्य घरोघरी पोहोचले. ●

T.V. चॅनेलवर डॉ. संजीव गोधा

गुजरातचे प्रसिद्ध GTPL च्या निर्माण न्यूज TV चॅनेलवर देश-विदेशात प्रसिद्ध जैन विद्वान डॉ. संजीवकुमारजी गोधा जयपूर यांचा क्षमावाणीच्या पावन प्रसंगी एक २५ मिनिटांचा इन्टरव्ह्यू दिनांक १३ सप्टेंबर २०१९ रोजी दोन वेळा प्रसारित करण्यात आला. या साक्षात्कारामध्ये अँकर नताशा बक्शी यांनी डॉ. संजीवजी गोधांना विचारलेल्या जवळपास १५ प्रश्नांच्या माध्यमातून या पर्वाचे महत्त्व आणि वर्तमान काळात याची आवश्यकता अत्यंत सुंदर पद्धतीने सांगण्यात आली.

देशातील १८ प्रांतातील अगणित लोकांनी हा साक्षात्कार टीव्हीवर पाहिला आणि हजारो लोकांनी याची प्रशंसा केली. आता YouTube च्या Drsanjeevgodha Channel वर Play list मध्ये विशिष्ट प्रवचनांमध्ये हा साक्षात्कार उपलब्ध आहे, आपण तेथून हा साक्षात्कार पाहू शकता.

पुरस्कार वितरण समारंभ संपन्न

जयपूर (राजस्थान) : श्री टोडरमल स्मारक भवनमध्ये दिनांक २ ऑक्टोबर २०१९ रोजी रात्री डॉ. हुकमचंदजी भारिल्ल यांच्या प्रवचनोपरान्त पुरस्कार वितरण समारंभ संपन्न झाला. यामध्ये श्री टोडरमल दिगंबर जैन सिद्धांत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिबिर-डायरी पुरस्कार, कण्ठपाठ पुरस्कार, दशलक्षण पर्वातील स्पर्धांचे पुरस्कार, 'ऐसे क्या पाप किये' विषयावर संपन्न झांकी (दृश्य) पुरस्कार आणि विविध स्पर्धा इत्यादींचे पुरस्कार यशस्वी विद्यार्थ्यांना प्रदान करून त्यांना पुरस्कृत करण्यात आले.

कार्यक्रमाची अध्यक्षता डॉ. हुकमचंदजी भारिल्ल यांनी केली. मंचासीन मान्यवरांमध्ये डॉ. शांतिकुमारजी पाटील, डॉ. दीपकजी जैन 'वैद्य', पण्डित राकेशजी शास्त्री दिल्ली, पण्डित पीयूषजी शास्त्री, पण्डित प्रमोदजी शास्त्री, श्री ताराचंदजी सौगानी, श्री हीराचंदजी बैद, जिनकुमारजी शास्त्री, जिनेन्द्रजी शास्त्री, नीशूजी शास्त्री, श्रीमती गुणमाला भारिल्ल इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे मंगलाचरण सहज जैन पिडावा (शास्त्री तृतीय वर्ष), संचालन शास्त्री तृतीय वर्षातील नयन जैन खनियांधाना व संयम जैन मडदेवरा यांनी केले आणि आभार प्रदर्शन गौरवजी शास्त्रींनी केले.

साप्ताहिक गोष्ठी संपन्न

जयपूर (राजस्थान) : श्री टोडरमल स्मारक भवनमध्ये दिनांक २२ सप्टेंबर २०१९ रोजी **जीवाचे स्वतत्त्व : पंचभाव** विषयावर गोष्ठीचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षता अध्यक्षता ब्र.विमलाबेन जबलपूर यांनी केली आणि विशिष्ट अतिथी म्हणून सौ. कमला भारिल्ल जयपूर प्रामुख्याने उपस्थित होत्या. श्रेष्ठ वक्ता म्हणून दीपक जैन मजगुवां (उपाध्याय कनिष्ठ) आणि सिद्धांत शेट्टी उगार (शास्त्री तृतीय वर्ष) यांची निवड झाली.

मंगलाचरण संयम जैन खैरागढ (उपाध्याय कनिष्ठ) यांनी तर संचालन शास्त्री तृतीय वर्षातील विनम्र जैन बडागांव व अभय जैन देवराहा यांनी केले. आभार प्रदर्शन व ग्रंथ भेंट जिनकुमारजी शास्त्रींनी केले.

दिनांक २९ सप्टेंबर २०१९ रोजी **'प्राकृत अध्ययनानाची आवश्यकता : ऐतिहासिक दृष्टीकोनातून'** या विषयावर गोष्ठीचे आयोजन करण्यात आले. या सभेची अध्यक्षता डॉ. कमलचंदजी सौगानी (निर्देशक, जैनविद्या संस्थान) जयपूर यांनी केली. श्रेष्ठ वक्ता म्हणून चेतन जैन गुढाचन्द्रजी (उपाध्याय वरिष्ठ) आणि स्वस्ती सेठी जयपूर (शास्त्री प्रथमवर्ष) हे ठरले.

मंगलाचरण भव्य जैन उदयपूर (उपाध्याय कनिष्ठ) यांनी तर संचालन शास्त्री तृतीय वर्षातील प्रजल जैन खनियांधाना व नमन जैन भरतपूर यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. शांतिकुमारजी पाटील यांनी केले.

शिबिराचे समापन आणि पुरस्कार वितरण

जयपूर (राजस्थान) : श्री टोडरमल स्मारक भवनमध्ये २२ व्या आध्यात्मिक शिक्षण शिबिराचे समापन आणि पुरस्कार वितरण समारंभ **डॉ. हुकमंचदजी भारिल्ल** यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० ऑक्टोबर २०१९ च्या रात्री संपन्न झाला.

या प्रसंगी समस्त विद्वान व शिक्षकांसह श्री त्रिलोकचंदजी भरतपूर, पण्डित मनोजजी मुजफ्फरनगर, श्री जनीशजी सनावद, श्री सत्येन्द्रजी जयपूर, श्री प्रेमचंदजी दौसा, श्री ताराचंदजी सौगानी जयपूर, श्री किरणभाई गाला मुंबई, श्री अनेकांतजी भारिल्ल, श्रीमती कमला भारिल्ल, श्रीमती गुणमाला भारिल्ल, श्रीमती संस्कृती गोधा, श्रीमती शशि जयपूर, श्रीमती विमला जयपूर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. डॉ. शांतिकुमारजी पाटील, डॉ. संजीवकुमारजी गोधा, डॉ. दीपकजी वैद्य, श्री परमात्मप्रकाशजी भारिल्ल यांनी आपले विचार व्यक्त केले. तदनंतर यशस्वी विद्यार्थ्यांना नगदी रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन पुरस्कृत करण्यात आले.

या प्रसंगी संयम जैन गुढाचन्द्रजी, संयम जैन मडदेवरा, निखिल जैन फिरोजाबाद यांनी महाविद्यालय व शिबिर संबंधी काव्यपाठ करून आपले मनोभाव व्यक्त केले. तसेच प्रजल जैन खनियांधाना व आयुष जैन गौरझामर यांनी डॉ. हुकमचंदजी भारिल्ल, पण्डित रतनचंदजी भारिल्ल, डॉ. शान्तिकुमारजी पाटील, डॉ. संजीवकुमारजी गोधा यांचे चित्र (स्केच) तयार करून भेट दिले. या कार्यक्रमामध्ये दुर्लभ जैन गुढाचन्द्रजी, संयम जैन दिल्ली, पवित्र जैन आगरा, शाश्वत जैन भोपाळ, उमंग जैन अमरमऊ, आकाश जैन बेलगांव इत्यादी विद्यार्थ्यांनी शिबिराविषयी आपले अनुभव वक्तव्यातून सांगितले.

अध्यक्षीय उद्‌बोधनामध्ये दीक्षांत भाषण देताना डॉ. भारिल्ल म्हणाले की देशातील विविध विषयांचे विशेषज्ञ अध्यापकांचा लाभ सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळावा, या करीताच या शिबिराचे आयोजन केले जाते. सर्व महाविद्यालयांचे विद्यार्थी समान आहेत, सर्वांनी मिळून तत्त्वज्ञान शिकायचे आहे व प्रचार-प्रसार करायचा आहे. पण्डित जिनकुमारजी शास्त्रींनी शिबिराचा रिपोर्ट आणि परीक्षेचा निकाल सादर केला. शेवटच्या दिवशी चारही महाविद्यालयातील (जयपूर १९४, बांसवाडा ४५, कोटा ४७, उदयपूर २६) एकूण ३१२ विद्यार्थी आणि इतर १२, अशा एकूण ३२४ विद्यार्थ्यांनी ३२४ साधर्मींनी परीक्षा दिली. महाविद्यालयातून विशेष स्थान प्राप्त करणारे विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत –

उपाध्याय वर्गामध्ये जयपूरहून अरविन्द जैन खडैरी प्रथम व आदित्य जैन फुटैरा द्वितीय स्थान, **कोटाहून** हिमेश जैन शाहगढ प्रथम व राहुल जैन दिल्ली द्वितीय स्थान, **बांसवाडाहून** अतिशय जैन मुजफ्फरनगर प्रथम व अमित जैन नौगांव द्वितीय स्थान प्राप्त केले.

शास्त्री प्रथम वर्षामध्ये जयपूरहून अनिमेष भारिल्ल राघौगढ प्रथम व स्वस्ती सेठी जयपूर द्वितीय स्थान, **कोटाहून** वंश जैन पिडावा प्रथम व अंकित जैन कन्नपूर द्वितीय स्थान, **बांसवाडाहून**

अनेकान्त काळे राजूरा प्रथम व आशीष जैन घुवारा द्वितीय स्थान, **उदयपूरहून** सुरभी जैन मुंबई प्रथम व रश्मी जैन अभाना ने द्वितीय स्थान प्राप्त केले.

शास्त्री द्वितीय-तृतीय वर्ष जयपूरहून संयम जैन दिल्ली प्रथम व पवित्र जैन आगरा द्वितीय स्थान, **कोटाहून** अभिषेक लोधी हिरावल प्रथम व शुभम जैन घुवारा द्वितीय स्थान, **बांसवाडाहून** सुशांत चौगुले पंढरपूर प्रथम व सुप्रीम जैन पिडावा द्वितीय स्थान, **उदयपूरहूने** मयूरी जैन शाहगढ प्रथम व प्रियंका जैन बजरंगगढ द्वितीय स्थान प्राप्त केले.

मंगलाचरण संयम जैन देशमाने बीड, संचालन समर्थ जैन विदिशा व आभार प्रदर्शन जिनेन्द्रजी शास्त्रींनी केले.

अमेरिकेमध्ये धर्मप्रभावना

वर्जीनिया (अमेरिका) : दशलक्षण महापर्वाच्या प्रसंगी येथे ब्र. अभिनन्दनजी शास्त्री देवळाली यांचेद्वारे सकाळी पूजा व सायंकाळी मोक्षमार्गप्रकाशक आणि रत्नकरण्डश्रावकाचार या ग्रंथांच्या आधारे दशलक्षण धर्मावर मार्मिक प्रवचने झाली. याव्यतिरिक्त जिनेन्द्र-भक्तीचे देखील आयोजन करण्यात आले. तेथील श्रोत्यांनी श्री महेन्द्रजी शाह, श्री शशिकांतजी शहा, श्री इन्द्रवदनजी शहा इत्यादींनी म्हटले की आम्ही वीस वर्षांपासून विद्वानांना आमंत्रित करीत आहोत, परंतु असा विद्वान कधीही आला नाही. येथे एक तेरापंथी दिगंबर जैन मंदिर निर्माणाधीन आहे.

हार्दिक अभिनंदन

जयपूर (राजस्थान) : येथील बापूनगर स्थित राजकीय महाराजा आचार्य संस्कृत महाविद्यालयामध्ये दिनांक १९ सप्टेंबर २०१९ रोजी हिन्दी दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयीन स्तरावर हिंदी दिनाच्या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, त्यापैकी काव्यपाठ स्पर्धेमध्ये अतिशय जैन चौरई (शास्त्री द्वितीय वर्ष) या विद्यार्थ्यास प्रथम स्थान मिळाले, तर समकित जैन ईसागढ (शास्त्री प्रथम वर्ष) या विद्यार्थ्याला द्वितीय स्थान प्राप्त झाले. तसेच वादविवाद स्पर्धेमध्ये (पक्षातून) प्रथम स्थान संयम जैन तिगौडा (शास्त्री द्वितीय वर्ष) आणि विपक्षातून प्रथम स्थान आप्त अनुशीलन जैन दमोह (शास्त्री द्वितीय वर्ष) या विद्यार्थ्यास प्राप्त झाले.

या उपलब्धीकरीता श्री टोडरमल दिगंबर जैन महाविद्यालय आणि वीतराग-विज्ञान परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन.

डॉ. दीपकजी वैद्य यांचेद्वारे विशेष वर्ग

मंगलायतन-अलीगढ : दिनांक ६ ते १२ ऑक्टोबर २०१९ पर्यंत श्री टोडरमल स्मारक चे वरिष्ठ अध्यापक डॉ. दीपकजी जैन 'वैद्य' जयपूर यांनी गोम्मटसार ग्रंथाच्या आधारे जैन अलौकिक गणित आणि जीव समास प्रकरणांवर विशेष वर्ग घेण्यात आले. तसेच विदुषी श्रुती जैन यांनी छहढालाचे वर्ग घेतले. सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने वर्गांच्या माध्यमातून धर्मलाभ घेतला.

विश्वस्तरीय सत्पथ प्रश्नमंचाची घोषणा

आचार्यकल्प पण्डित टोडरमलजींच्या त्रिजन्मशताब्दी महोत्सवाचे प्रसंगी सत्पथ फाउण्डेशन नागपूर यांनी स्वाध्यायाच्या परंपरेला विकसित करण्याकरीता सम्मेदशिखरजीमध्ये शिक्षण शिबिराच्या प्रसंगी 'विश्वस्तरीय सत्पथ प्रश्नमंचाची' घोषणा केली. या माहितीपत्रकाचे विमोचन ब्र. सुमतप्रकाशजी खनियांधाना यांचे सानिध्यात अनेक विद्वान व श्रेष्ठींनी आपल्या शुभहस्ते हजारो साधर्मी बांधवांच्या उपस्थितीत केले.

पण्डित टोडरमलजींच्या जीवनावर आधारित प्रश्नमंचाची विस्तृत माहिती देताना डॉ. संजीवकुमारजी गोधा जयपूर म्हणाले की यामध्ये १००८ विकल्पात्मक प्रश्न असतील आणि १००८ स्पर्धकांना पुरस्कृत केले जाईल. या माध्यमातून ऐतिहासिक महापुरुष मनीषी विद्वान आचार्यकल्प पंडित टोडरमलजी आणि त्यांनी लिहिलेल्या साहित्याच्या बाबतीत अधिकाधिक लोकांना शिक्षित केले जाईल.

कार्यक्रमाचे संचालन पण्डित विपिनजी शास्त्री नागपूर यांनी केले.

लॉस एन्जिल्समध्ये डॉ. शुद्धात्मप्रभा टडैया

लॉस एन्जिल्स (अमेरिका) : येथे दशलक्षण महापर्वाच्या प्रसंगी डॉ. शुद्धात्मप्रभा टडैया मुंबई यांची सकाळी अध्यात्माचे नय आणि सायंकाळी आत्मानुभूतीकरीता आवश्यक जैन सिद्धांत विषयांवर प्रवचने झाली. शनिवारी युवकांकरीता विशेषपणे निर्मित 'आर्ट ऑफ हॅप्पी लिव्हिंग' नामक विशेष सेमिनार आयोजित करण्यात आले. यामध्ये जैन सिद्धांतांच्या प्रॅक्टीकल ॲप्लीकेशनवर चर्चा करण्यात आली. याशिवाय श्री अविनाशजी टडैया यांचेद्वारे अनेक ज्ञानवर्धक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले.

दशलक्षण महापर्वाच्या नंतर न्यूजर्सी (अमेरिका) मध्ये डॉ. शुद्धात्मप्रभा टडैया यांनी आपल्या व्यक्तिगत प्रवासादरम्यान साधर्मी बांधवांशी तत्त्वचर्चा केली. सर्व साधर्मी ही चर्चा ऐकून अत्यंत प्रभावित झाले आणि यापुढे ऑनलाईन तत्त्वचर्चा करण्याची भावना त्या सर्वांनी व्यक्त केली.

वैराग्य वृत्त

अहमदबाद (गुजरात) निवासी श्री प्रभुलालजी जैन यांचे शांत-परिणामपूर्वक देहावसान झाले. ते वस्त्रापुर मंदिर सभेचे नियमित स्वाध्यायी होते. सोनगढ येथे जाऊन गुरुदेवश्रींच्या सानिध्यात तत्त्वज्ञानाचा लाभ ते घेत असत. त्यांचे स्मृतीप्रीत्यर्थ श्री सुरेशचंदजी जैन, पवनजी जैन आणि जम्बूकुमार जैन यांचेतर्फे संस्थेला २१००/- रुपये प्राप्त झाले.

दिवंगत आत्म्याने चतुर्गतीच्या दु:खातून सुटून शीघ्र अनंत अतींद्रिय आनंदाला प्राप्त करावे, ही मंगल भावना.